# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

❖ **आपत्ती व्यवस्थापनासाठी महत्त्वाचे पाऊल – Disaster Response Force (DRF) स्थापन करण्यासाठी बैठक संपन्न**

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मा. राधाबिनोद शर्मा (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली आपत्ती व्यवस्थापन विभागाची एक महत्त्वपूर्ण बैठक महापालिकेच्या मुख्यालयात घेण्यात आली. या बैठकीचा मुख्य उद्देश म्हणजे महानगरपालिका कार्यक्षेत्रात आपत्ती व आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी Disaster Response Force (DRF) तयार करणे हा होता.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरात संभाव्य नैसर्गिक आपत्ती, पूर, जलमय स्थिती, इमारत कोसळणे, वृक्ष पडणे, वीज कोसळणे, व अन्य आपत्कालीन प्रसंग अधिक प्रभावीपणे हाताळण्यासाठी महापालिकेने DRF स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या बैठकीत DRF ची प्राथमिक रचना, मनुष्यबळाची गरज, आवश्यक यंत्रसामग्री, उपकरणे, प्रशिक्षण व त्यांच्या जलद प्रतिसाद प्रणाली यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विविध विभागांमधील समन्वय, नियंत्रण कक्षाच्या भूमिकेचा आढावा व संभाव्य धोक्यांवर त्वरित उपाययोजना या मुद्द्यांवरही मार्गदर्शन करण्यात आले. DRF ही आपत्ती काळात शहरासाठी पहिली प्रतिसाद देणारी यंत्रणा ठरेल. प्रशिक्षित व सज्ज पथक असल्यास आपण नागरिकांचे जीवित आणि वित्तीय नुकसान मोठ्या प्रमाणात टाळू शकतो असे मा. आयुक्त यांनी सांगितले. महापालिकेच्या या पुढाकारामुळे आपत्कालीन परिस्थितीत अधिक सुनियोजित व तात्काळ प्रतिसाद देणे शक्य होणार असून, मिरा भाईंदर शहर अधिक सुरक्षित बनविण्याकडे एक सकारात्मक पाऊल ठरणार आहे.